# २) श्री ज्ञानेश्वरीतील श्री गणेशाचे स्वरूप व भारतीय ग्रंथसंपदा

**ह. भ. प. श्री. सुभाष महाराज गेठे**

**प्रास्तविक :**

**ॐ नमोजी आद्या । वेदप्रतिपाद्या ।**
**जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा।।१।।**
**देवा तूचि गणेशु । सकलमतिप्रकाशु ।**
**म्हणे निवृत्तिदासु । अवधारिजो जी।।२।।** अ. १

**अर्थ :** हे सर्वांचे मूळ असणाऱ्या वेदांच्या प्रतिपादनाचा विषय असणाऱ्या ओंकारा तुला नमस्कार असो व स्वतःला स्वतः जाणण्यास योग्य असणाऱ्या आणि सर्वव्यापी अशा आत्मरूपी ओंकारा तुझा जय जयकार असो.

वरील विशेषणांनी युक्त अशा देवा सर्वांच्या बुद्धीचा प्रकाश जो गणेश, तो तूच स्वतः आहेस. श्री निवृत्तीनाथांचे शिष्य (श्री ज्ञानेश्वर महाराज) म्हणतात त्या निर्गुण निराकार गणेशाच्या वाङ्मय रूपातील सगुण साकार स्वरूपाचे वर्णन ऐका.

कोणत्याही कार्याला प्रारंभ करताना भगवान श्री गणेशाला वंदन केले जाते. गणपती ही विद्येची देवता आहे. विघ्नाचा नाश करणे, सुखाची निर्मिती करणे, भक्ताला दुःखाची वार्ता ही कानावर येऊ न देणे इ. गणेश वंदनेची फलश्रुती आहे – सुखकर्ता, दुःखहर्ता, वार्ता विघ्नाची । नुरवी, पुरवी प्रेम कृपा जयाची।।

भारतीय विचार परंपरेत हाती घेतलेले कार्य परिपूर्ण आणि

निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी गणेश वंदना केली जाते. श्री संत ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या काव्य प्रतिभेने आणि गुरुकृपेने गणेशाची अलौकिक मूर्ती शब्दचित्राने रेखांकित केलेली आहे. ज्ञानदेवांनी वाङ्मय गणेश रेखांकित केला आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद हे चार वेद आणि आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद, शिल्पवेद हे उपवेद आहेत.

ज्ञानदेवांनी या वेदांसाठी शब्दब्रह्म या शब्दाचा प्रयोग केला आहे. आणि संपूर्ण वेद यासाठी अशेष या शब्दाचा प्रयोग केला आहे. संपूर्ण अपौरुष वेद वाङ्मय हीच गणपतीची सजलेली सुंदर मूर्ती आहे. वेदातील निर्दोषता हीच गणपतीची शोभा आहे.

**हे शब्दब्रह्म अशेष । तेचि मूर्ती सुवेष ।**
**तेथ वर्णवपु निर्दोष । मिरवत असे।।३।।** अ. १

श्री संत ज्ञानदेवांनी अपौरुष वेदाला सर्वश्रेष्ठ स्थान देऊन गणपतीचीच वाङ्मयीन मूर्ती रेखाटली आहे. गणपतीच्या वेगवेगळ्या अवयवांच्या ठिकाणी स्मृतीग्रंथांची योजना केलेली आहे. स्मृतीग्रंथ हेच गणपतीचे अवयव. वेदातील गूढ अर्थ अधिक स्पष्ट करण्याचे ग्रंथ म्हणजेच स्मृतीग्रंथ अनेक आहेत. उदा. अत्रीस्मृती, नारदस्मृती मनुस्मृती. मानवी जीवनाचे आचार-विचार यांचा पद्धतशीर संग्रह या स्मृतीग्रंथात असतो. त्यातील गंभीर अर्थ हाच गणपतीच्या अवयवांची शोभा आहे. श्री गणेशांच्या अंगावर विविध प्रकारचे अलंकार विभूषित आहेत. अठरा पुराणे हेच जणू गणपतीच्या अंगावरील अलंकार आहेत. उपनिषदातील प्रतिपादन शैली हेच जणू सिद्धांचे कोंदण आहेत, असे श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

**मद्वयं भद्वयं चैव ब्रत्रयं वचतुष्टयम् ।**
**नालिंपाग्निपुराणानि कुस्कं गारुडमेवच।।**

१-मत्स्य, २-मार्कंडेय, ३-भाविष्य, ४-भागवत, ५-ब्रह्म. ६-ब्रह्मवैवर्त, ७-ब्रह्मांड, ८-विष्णू, ५-वायू, १०-वराह, ११-वामन, १२-नारद, १३-लिंग, १४-पद्म, १५-अग्नी, १६-कूर्म, १७-स्कंद, १८-गरुड- ही अठरा पुराणे असून अठरा उपपुराणेसुद्धा आहेत. या पुराणातील कौशल्यपूर्ण शब्दरचना हेच गणेशांनी परिधान केलेले रंगीत वस्त्र आहे. शब्दालंकार, अर्थ अलंकार हे त्या वस्त्रातील चमकणारे तलमतंतू आहेत. कवी कालिदास, वाल्मीकी, दंडी, भवभूती, भारवी, राजशेखर, माघ इत्यादी कवींनी निर्माण केलेली काव्यसंपदा अर्थात नाटके हे जणू काही भगवान गणेश यांच्या पायातील रुणझुणु आवाज करणारे पैंजण होईल. उदा. कवी कालिदासांनी लिहिलेली नाटके शाकुंतल, मेघदूत, ऋतुसंहार इत्यादी.

**देखा काव्य नाटका । जे निर्धारितां सकौतुका ।**
**त्याची रुणझुणती क्षुद्रघंटिका । अर्थध्वनी।।७।।** अ. १

उपरोक्त वरील सर्व कवींच्या काव्य नाटकातील विविध सिद्धांत हेच गणपतीच्या पायातील पैंजण रत्न होय. महर्षी व्यास, महर्षी जैमिनी, महर्षी कपिल, महर्षी पतंजली, महर्षी गौतम, महर्षी कणाद इ. विचारवंत अर्थात दार्शनिकांची निर्दोष बुद्धी म्हणजेच भगवान गणेश यांच्या कमरेला गुंडाळलेला शेला होय.

**तेथ व्यासादिकांच्या मतीं । तेचि मेखळा मिरवती ।**
**चोखाळपणे झळकती। पल्लवसडका।।९।।**

न्याय दर्शन, वैशेषिक दर्शन, सांख्य दर्शन, पातंजल दर्शन, पूर्वमीमांसा दर्शन, आणि वेदांत दर्शन ही सहा आस्तिक दर्शने मानली जातात. ही सहा दर्शने म्हणजेच श्री गणेशांचे जणू काय सहा हात होय. या दर्शन ग्रंथातील परस्पर विरोधी असणारे सिद्धांत हिच जणू

काही गणपतीच्या हातातील सहा आयुधे होत. उदा. परशु, अंकुश, मोदक, भग्नदंत, कमळ आणि अभय हीच गणपतीच्या सहा हातांतील आयुधे आहेत.

**देखा षड्दर्शनें म्हणिपती । तेची भुजांची आकृति ।**
**म्हणौनि विसंवादे धरिती । आयुधे हातीं।।१०।।**

महर्षी गौतम यांचे न्याय दर्शन, त्यातील अनुमान तर्क हेच गणपतीच्या एका हातातील आयुध परशु हे होय. महर्षी कणाद प्रणित वैशेषिक दर्शन, त्या दर्शनातील नीतिरूपी धर्म हाच गणपतीच्या हातातील अंकुश – एक आयुध होय. महर्षी व्यास लिखित वेदांत दर्शन, त्या दर्शनातील ब्रह्मज्ञान हाच गणपतीच्या हातातील गोड असा मोदक शोभत आहे.

**तरी तर्कु तोचि फरशु । नीतिभेदु अंकुशु ।**
**वेदांतु तो महारसु । मोदकु मिरवे।।११।।**

श्री गणेशाच्या एका हातात खंडित अर्थात भग्नदात आहे तो भग्नदात खंडित बौद्ध मताचे निर्देश करणारा आहे.

**एके हातीं दंतु । जो स्वभावता खंडितु ।**
**तो बौद्धमतसंकेतु । वार्तिकांचा।।१२।।**

भगवान गणेशाचा एक हात अभय देणारा आहे. त्यास 'पद्मकरू वरदू' म्हणजे 'वर' देणारा पद्माकार असणारा एक हात. त्या हाताच्या ठिकाणी सांख्यशास्त्राचा सत्कारवाद हा जो सिद्धांत आहे, त्याची योजना केलेली आहे. भगवान श्री गणेशाची सोंड अत्यंत शुद्ध अशा विवेकाचे उपलक्षण मानलेले आहे. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या मते, गणेशाची ती सोंड परमानंद आणि महासुखाचे प्रतीक आहे. योग्य, अयोग्य याचा निर्णय करण्याच्या सामर्थ्याला विवेक म्हणतात. हा

विवेक गणपतीला सोंडेच्या माध्यमातून साधता येतो.

**देखा विवेकवंतु सुविमळु । तोचि शुंडादंडु सरळु ।**
**जेथ परमानंदु केवळु । महासुखाचा।।१४।।**

श्री गणेशाच्या एका अखंड दाताच्या ठिकाणी संवादाची कल्पना केलेली आहे. एखादा तत्त्व निर्णय करण्यासाठी आदरयुक्त आणि जिज्ञासायुक्त केलेल्या चर्चेस संवाद म्हणतात. श्रीकृष्ण आणि अर्जुन यांचा संवाद म्हणजेच श्री भगवत्‌गीता. बरेचसे भारतीय ग्रंथ संवादाच्या रूपानेच लिहिलेले आहेत. असा संवाद श्री गणेशाचा दात असून त्या संवादातील निःपक्षपातीपणा हाच गणपतीच्या दाताच्या ठिकाणचा शुभ्र पणा होय.

त्यास श्री संत ज्ञानदेव 'जो समताशुभ्रवर्णु' असा नामनिर्देश करतात. गणपतीच्या डोळ्याच्या ठिकाणी ज्ञानाची कल्पना योजतात म्हणजेच ज्ञानातला सूक्ष्मपणा हाच गणपतीचा डोळा होय. ज्ञान या सत्त्वगुणांमध्ये कोणत्याही वस्तूकडे सूक्ष्मतेने पाहता येते, आणि कोणत्याही वस्तूचे स्वरूप ज्ञानाने यथार्थ समजते.

**तरी संवादु तोचि दशनु । जो समता शुभ्रवर्णु ।**
**देवो उन्मेषसूक्ष्मेक्षणु । विघ्नराजु।।१५।।**

हत्तीच्या गंडस्थळातून निघणारा, त्याच्या कानावर वाहणारा चिकट द्रव्याचा स्राव त्याला 'मद' म्हणतात. त्या मदात विशिष्ट सुगंध असून तो सेवन करण्यासाठी भ्रमर अवतीभवती गुंजारव करत असतात. श्री माउलींनी ज्ञानाला 'मद' म्हटले आहे. आणि त्या ज्ञानमदरूपी अमृताच्या ठिकाणी, मनन करणारे मुनी हेच कोणी भ्रमर ज्ञानाचे सेवन करतात. आचार आणि विचार हेच जणू गणपतीचे दोन कान, आचार-विचाराच्या ज्ञानाला या ठिकाणी बोध म्हटले आहे. बोध म्हणजे ज्ञान म्हटले आहे. आणि त्याचे

आस्वादन मुनिरूपी भ्रमर करत आहेत, असे रूपक ज्ञानदेव गणपतीच्या कानाच्या ठिकाणी करत आहेत.

**मज अवगमलिया दोनी । मीमांसा श्रवणस्थानीं ।**
**बोधमदामृत मुनी । अली सेविती।।१६।।**

गणपतीच्या गळ्यामध्ये पोवळ्याची जी माळ आहे, तीच जणू काही श्रुती-स्मृती-पुराण इ. ग्रंथातील सिद्धांत आहेत. त्याचप्रमाणे द्वैत आणि अद्वैत हे गणपतीचे गंडस्थळ आहे आणि ते सारखेपणाने गणपतीच्या मस्तकावर शोभत आहे. भगवान गणेशाच्या मस्तकावरती असणारा जो मुकूट आणि त्या मुकुटावरती असणारी सुगंधित फुले हिच जणू काही ज्ञान देण्यामध्ये उदार असणारी दशोपनिषदे आहेत, असे ज्ञानदेव म्हणतात. सर्व वाङ्मयात ज्ञानदेवांनी उपनिषदांना सर्वोच्च स्थान दिले आहेत, ते म्हणजे गणपतीच्या मस्तकावरील सुगंधी पुष्प होत. (१) ईश, (२) केन, (३) कठ, (४) प्रश्न, (५) मुण्डक, (६) मांडूक्य, (७) ऐतरिय, (८) तैत्तिरीय, (९) छान्दोग्य, (१०) बृहदारण्यक. ही प्रमुख दहा उपनिषदे आहेत. त्यावर आद्य श्री शंकराचार्यांनी वयाच्या १६ व्या वर्षी संस्कृत भाष्य केले आहे.

**उपरि दशोपनिषदे । जिये उदारे ज्ञानमकरंदे ।**
**तिये कुसुमे मुगुटी सुगंधे । शोभती भली।।१८।।**

ओंकार म्हणजेच ॐ हा अ, ऊ आणि म या तीन वर्णांचा मिळून झालेला आहे. म्हणजेच अ+ऊ+म=ओम. ‘अ’ काराच्या ठिकाणी गणेशांच्या चरणाची उपमा दिलेली आहे, ‘ऊ’ कार हेच जणू गणेशाचे उदर आहे. आणि ‘म’ कार हेच जणू गणेशाचे मस्तक आहे. या वरून श्री ज्ञानदेवांनी गुरुकृपेने समजलेला गणेश हा ओंकारमय अशा स्वरूपात रेखांकित केलेला आहे.

**अकार चरण युगुल । उकार उदर विशाल ।**
**मकार महामंडल । मस्तकाकारे।।१९।।**
**हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळले ।**
**ते मिया श्रीगुरुकृपा नमिले । आदिबीज।।२०।।** अ. १

## श्री ज्ञानेश्वरीतील श्री गणेशाची वैदिक अक्षरमय मूर्ती

| | | |
|---|---|---|
| गणपतीची सजवलेली मूर्ती | – | संपूर्ण वेदाच्याद्वारे |
| अंगकांती किंवा सौंदर्य | – | वेदातील निर्दोषता |
| गणपतीचे अवयव | – | स्मृती ग्रंथ |
| गणपतीची लावण्य ठेव | – | स्मृतीग्रंथांमधील अर्थ |
| रत्नखचित अलंकार | – | अठरा पुराणे |
| रत्ने | – | १८ पुराणांत सांगितलेले सिद्धांत |
| अंगठी | – | छंदोबद्ध पदरचना |
| कोंदणे | – | सिद्धांतरूपी रत्ने |
| गणपतीच्या अंगावरील | | |
| रंगीत वस्त्र | – | उत्तम पदलालित्य |
| रेशमी वस्त्र | – | अलंकारशास्त्र |
| पायातील पैंजण | – | काव्य – नाटके |
| पैंजाणांचा ध्वनी | – | काव्य – नाटकांमधील अर्थ |
| रत्ने | – | काव्य–नाटकांतील प्रमेय सिद्धांत – यथार्थ वाहक पदे. |
| गणपतीच्या कमरेचा शेला | – | सहा दर्शनकारांच्या बुद्धी उदा. व्यास–मति |
| शेल्याचा झळकणारा अग्रभाग | – | सहाही दर्शनकारांच्या बुद्धीची निर्मळता, निर्दोषता, सरळ वृत्ती |
| गणपतीच्या सहा भुजा | – | सहा आस्तिक दर्शनकार |

| | | |
|---|---|---|
| **गणपतीच्या हातातील आयुध** | **–** | **दर्शनकारांची निरनिराळी परस्पर विरोधी मतांतरे** |
| १) परशु–कुऱ्हाड | – | तर्क |
| २) अंकुश | – | नीतिभेद |
| ३) मोदक | – | वेदांत |
| ४) खंडित दात | – | स्वाभाविक खंडित बौद्धमताचे निर्देशक वार्तिक ग्रंथ. |
| ५) हातातील कमळ | – | सत्कारवाद |
| ६) अभय हस्त | – | धर्मप्रतिष्ठा |
| गणपतीची सोंड | – | विवेक |
| दात | – | संवाद |
| दातांचा शुभ्रवर्ण | – | समता |
| बारीक डोळ | – | ज्ञानाची सूक्ष्मता |
| दोन कान | – | १) पूर्वमीमांसा (आचार शास्त्र), २) उत्तरमीमांसा (विचारशास्त्र) |
| गंडस्थळातून निघणारा मद | – | ज्ञानामृत |
| भ्रमर | – | मुनी |
| गणपतीच्या अंगावरील कांतीमान पोवळे | – | श्रुतीस्मृती प्रतिपादित सिद्धांत |
| गंडस्थळ | – | द्वैत + अव्दैत |
| गणपतीच्या डोक्यावरील सुगंधीत फुले | – | ज्ञान देण्यात उदार असणारी दशोपनिषदे |
| ‘अ’ कार | – | गणपतीचे दोन्ही पाय |
| ‘उ’ कार | – | गणपतीचे उदर (पोट) |
| ‘म’ कार | – | गणपतीचे मस्तक |

अ + उ + म = ॐ हे संपूर्ण वेदाचे मूळ आदिबीज.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज ह्या वैदिक अक्षरांनी गौरविलेल्या गणपतीला नमस्कार करतात, की जो श्रीगुरुकृपेमुळे समजला.

## वाङ्मय गणेश



**अपौरुषेय वेद**

१) ऋग्वेद, २) यजुर्वेद, ३) सामवेद, ४) अथर्ववेद

**(उपवेद)**

आयुर्वेद, अर्थशास्त्र, गांधर्व वेद, धनुर्वेद

**(वेदांगे)**

१) शिक्षा, २) कल्प, ३) व्याकरण, ४) छंद,
५) ज्योतिष, ६) निरुक्त

**(दर्शन शास्त्रे)**

| | |
|---|---|
| आस्तिक | नास्तिक |
| वेद प्रामाण्य मानणारे | वेद प्रामाण्य न मानणारे |

| **आस्तिक दर्शन** | **कर्ता** |
|---|---|
| १. न्यायदर्शन | महर्षी गौतम |
| २. वैशैषिक | महर्षी कणाद |
| ३. सांख्यदर्शन | महर्षी कपिल |
| ४. योगदर्शन | महर्षी पतंजली |
| ५. पूर्वमीमांसा | महर्षी जैमिनी |
| ६. उत्तरमीमांसा | महर्षी व्यास |

**नास्तिक**

१. जैन, २. बौद्ध, ३. चार्वाक

बौद्ध : अ. माध्यमिक, ब. योगाचार, क. वैभाषिक, ड. सौत्रांतिक

## १८ मुख्य पुराणे

१. मत्स्य, २. मार्कंडेय, ३. भविष्य, ४. भागवत, ५. ब्रह्म, ६. ब्रह्मवैवर्त, ७. ब्रह्मांड, ८. विष्णू, ९. वायू, १०. वराह, ११. वामन, १२. नारद, १३. लिंग, १४. पद्म, १५. अग्नी, १६. कूर्म, १७. स्कंद, १८. गरुड

## १८ मुख्य स्मृती

१. याज्ञवल्क्य स्मृती, २. मनु स्मृती, ३. अत्री स्मृती, ४. अंगिरा स्मृती, ५. कात्यायन स्मृती, ६. बृहस्पती स्मृती, ७. पराशर स्मृती, ८. व्यास स्मृती, ९. गौतम स्मृती, १०. वशिष्ठ स्मृती, ११. आपस्तंभ स्मृती, १२. देवल स्मृती, १३. शंख स्मृती, १४. दक्ष स्मृती, १५. शतातप स्मृती, १६. लघु विष्णु स्मृती, १७. विश्वामित्र स्मृती, १८. यम स्मृती,

## संस्कृत काव्ये

१. ऋतुसंहार, २. मेघदूत, ३. कुमारसंभवम्, ४. रघुवंशम्, ५. किरातार्जुनीय, ६. शिशुपालवधम्

## संस्कृत नाटके

१. अभिज्ञानशाकुंतलम्, २. मालविकाग्निमित्रम्, ३. स्वप्नवासवदत्तम्, ४. यज्ञफलम्, ५. उत्तररामचरितम्, ६. मृच्छकटिकम्

## संस्कृत कवी

१. कालिदास, २. दन्डी, ३. भारवी, ४. भास, ५. भवभूती, ६. कवी मम्मट

**उपमा कालिदासस्य । भारवेः अर्थगौरवम् ।**
**दण्डिनः पद लालित्यं । माघे सन्ति त्रयो गुणाः।।**

## श्री ज्ञानेश्वरीतील श्री गणेशाचे स्वरूप व भारतीय ग्रंथसंपदा

भारतीय वैदिक सनातन संस्कृतीमध्ये श्री गणेशाचे स्थान अग्रणी आहे. कोणत्याही कार्याच्या प्रारंभाला श्री गणेशाचे पूजन किंवा स्मरण करून कार्याला आरंभ केला जातो. साहित्य क्षेत्रातही हाच अनुभव सामान्यतः आस्तिक विचार प्रणाली मध्ये दिसतो. श्रुती वाङ्मय स्मार्त वाङ्मय अथवा पौराणिक वाङ्मय इत्यादी सर्व वाङ्मय प्रकारात श्री गणेशाला अग्रगण्य आणि आदराचे स्थान दिले गेले आहे. श्री संत गणक ऋषी यांनी श्री गणपती अथर्वशीर्ष हे लघुकाय संस्कृत उपनिषद प्रतिपादन करताना गणपतीचे सर्वांगाने वर्णन केले आहे.

श्री गणपती अथर्वशीर्ष हे अथर्ववेदातील आहे. अथर्वशीर्ष या पदाचे अनेक अर्थ आहेत. अथर्वशीर्ष या शब्दात दोन पदे आहेत. त्यात अथर्व हे एक पद व दुसरे शीर्ष हे पद आहे. अ म्हणजे अभाव आणि थर्व म्हणजे चंचलता, आणि शीर्ष म्हणजे डोके मस्तक. 'अ+ थर्व+ शीर्ष = चंचलपणाचा अभाव असलेले डोके' असा अथर्वशीर्ष या शब्दाचा उत्पत्ती अर्थ होतो. म्हणजे चंचलतेचा अभाव असलेले डोके, म्हणजे अचंचल, शांत, स्थिर असलेले डोके असा अर्थ होईल.

अर्थात अचंचल - चिरस्थिर असलेले मस्तक म्हणजे मती-शक्ती होय. यावर श्री ज्ञानदेवांनी लिहिलेले विवरण अतिशय चिंतनीय आहे. 'अशेष शब्दब्रह्म' म्हणजे वेद हीच त्या 'सकलार्थ मती प्रकाशू' गणेशाची सुवेश मूर्ती आहे. तेथ वर्णवपु निर्दोष। मिरवतसे। म्हणजे भ्रम, प्रमाद, कर्णापाटव आणि विप्रलिप्सा इत्यादी दोष विवर्जित वर्णवपु वर्णात्मक काया - मंत्रवर्णरूप हेच त्या गणपतीचे सुंदर शरीर शोभत आहे.

याचा आशय असा की वेदैकगम्य असे ज्ञान हेच त्या दृगरूप श्री गणेशाचे स्वरूप आहे. ओंकारातील अ, उ, म या तीन मात्रा

आहेत. त्या ओंकारातील 'अ' कार मात्रा म्हणजे गणपतीचे दोन पाय आहेत, 'उ' कार मात्रा म्हणजे गणपतीचे विशाल उदर आहे आणि 'म' कार मात्रा म्हणजे वर्तुळाकार मोठे मस्तक आहे. 'अ' कार, 'उ' कार, 'म' कार या तीन मात्रा एकत्रित झाल्या असता तो ओंकार ज्या आकाराला प्राप्त होतो त्या आकारात संपूर्ण वेद संक्षेपाने समाविष्ट झाले आहेत. आणि जो ओंकार सर्व मंत्रांच्या बिजांमध्ये आदिबीज आहे किंवा जगाचे आदि बीज म्हणजे पहिले वहिले कारण आहे. अशा त्या ओंकार स्वरूप गणेशाला मी श्री सद्गुरू कृपेने नमस्कार करतो. गणेश ही लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांना हवीहवीशी वाटणारी प्रिय देवता आहे. म्हणूनच पारतंत्र्याच्या काळात ब्रिटिश राजवटीत लोकमान्य टिळकांनी सर्व समाज एकत्र यावा या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. त्यामुळे आध्यात्मिक उत्सवाला समाजोत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले. त्याचा फार मोठ्या प्रमाणात सकारात्मक परिणाम झाला.

श्री गणेशाच्या विग्रहाकडे पाहून आपण पाच प्रकारचा विवेक शिकू शकतो ते पुढील प्रमाणे...

**१) कर्ण विवेक :** कर्ण म्हणजे 'कान' आणि विवेक म्हणजे 'पृथक्करण' होय. श्री गणेशाचे कान आकाराने मोठे आहेत यातून आपण ज्ञानाची जिज्ञासा वाढवून गुरूंकडून व शिक्षकांकडून जास्तीत जास्त चांगले ऐकावे. जेणेकरून आपल्या जीवनात सदगुणांची वृद्धी होईल अवगुण आपल्या जीवनात ज्या शब्दांनी कानाच्या द्वारे येतील असे शब्द ग्रहण करण्याचे प्रयत्नपूर्वक टाळावे. थोडक्यात योग्य श्रवण करावे व अपशब्दांचे श्रवण टाळावे. तात्विक दृष्ट्या श्री गणेशाचा एक कान प्रवृत्ती शास्त्राचा व दुसरा कान निवृत्ती शास्त्राचा निर्देशक आहे.

**२) दृष्टी विवेक :** दृष्टी विवेक म्हणजे पाहण्याचा विवेक.

कोणत्याही गोष्टीकडे ढोबळ मनाने पाहिले असता तिचे वास्तव यथार्थ स्वरूप लक्षात येत नाही. सूक्ष्म ज्ञान दृष्टीने त्या गोष्टीचे किंवा परिस्थितीचे अवलोकन केले असता त्यातील गुणदोष लक्षात येतात. श्री गणेशाचे डोळे लहान आहेत व लहानपणा ज्ञानदृष्टीतील सूक्ष्मता दर्शवितो. कोणत्याही विषयाकडे पाहण्याची एक विशेष आणि सूक्ष्म दृष्टी श्री गणेशाच्या दृष्टी विवेकातून प्राप्त होते. डोळे उघडल्यानंतर बरे – वाईट अशा दोन्ही गोष्टी डोळ्यासमोर येतात. काय पाहायचे आणि काय पाहायचे नाही हा दृष्टी विवेक असेल तर विवेकी मनुष्य अयोग्य दृश्य टाळून योग्य आणि मंगलकारक दृश्यच पाहील. कसे पाहू नये यासाठी श्री ज्ञानेश्वर महाराज ज्याला दृष्टी विवेक आहे असा सद्व्यक्ती कसा पाहतो याचे उत्कृष्ट उदाहरण देतात.

**की महावनी पापिये। उघडी केली विपायें।**
**ते नेसविल्याविण न पाहे। शिष्टू जैसा।।१४४ ।।** अ. १६

तसेच दृष्टी विवेक असलेल्या व्यक्तीने काय आणि कसे पहावे यासाठी सुंदर असे शांत रसातील आणि शृंगार रसातील उदाहरण देतात.

**आत्मज्ञाने चोखडी। संत जे माझी रूपडी।**
**तेथ दृष्टी पडो आवडी। कामिनी जैसी।।१३५६।।** अ. १८

**३) नासिका विवेक :** श्री गणेशाची सोंड ही लांब आहे. ती लांब सोंड हीच त्याची नासिका म्हणजे नाक आहे. व्यवहारात नाक हे प्रतिष्ठेचे प्रतीक आहे. आपला देश, परिवार, आई–वडील, संस्कृती, धर्म, परंपरा या सर्वांचे आपण अनुयायी आहोत. आपल्या दैनंदिन जीवनात, व्यवहारात वागताना वरील परंपरेला आणि प्रतिष्ठेला बाधा पोहोचणार नाही अशीच वर्तणूक आपल्या हातून घडावी आणि अशी वर्तणूक ज्याच्या हातून घडते म्हणजे कोणत्याही प्रतिष्ठेला, परंपरेला

ज्यांच्या वागणुकीतून कसलीही बाधा पोहोचत नाही. अशा व्यक्तींचे नाक समाजात उंच / वर असते, म्हणजे त्यांचे समाजातील स्थान श्रेष्ठतेचे आणि अनुकरणीय असते.

**येथ वडील जे करिती । तया नाम धर्म ठेवीती ।**
**तेचि येर अनुष्ठिती । सामान्य सकळ।।**

श्री गणेशाच्या भौतिक विग्रहातील सोंड जरी वक्र म्हणजे वाकडी असली तरी तिच्यातील विवेक मात्र सरळच असतो. हा विवेक ज्ञानी, विवेकी लोकांनाच समजतो. हेच श्री गणेशाचे आध्यात्मिक स्वरूप आहे.

**जे तुझ्याविखी मूढ। तयां लागी तू वक्रतुंड।**
**ज्ञानियांसी तरी अखंड। उजूचि आहासि।।**

**४) उदर विवेक :** श्री गणेशाचे उदर म्हणजे पोट हे मोठे आहे. इतरांनी केलेले दोष किंवा अपराध हे उदार अंतकरणाने आपल्या पोटात समाविष्ट करून घेणे व अपराध करणाऱ्यांना क्षमा करणे हा श्री गणेशाचा एक गुणविशेष आहे. हाच उदर विवेक होय.

**५) स्थैर्य विवेक :** पृथ्वीतलावरील प्रत्येक प्राण्याची चालण्याची एक विशिष्ट पद्धत आहे. या सर्व चालणाऱ्या प्रकारांमध्ये हत्तीचे चालणे हे विशेष लक्षवेधी असते. गुणदोषांकडे लक्ष न देता हत्ती आपल्या ध्येयाच्या दिशेने अगदी धैर्याने चालत राहतो. हत्तीचेच मस्तक गणेशाला असल्यामुळे त्याचे चालणे धीरगंभीर, स्थैर्यात्मक, प्रसन्न आहे. या चालण्यातून विद्यार्थ्यांनी यश - अपयशाच्या अडथळ्यात थांबून न राहता ध्येयप्राप्तीच्या दिशेने सतत प्रयत्न करत राहावे असा बोध घ्यावा.

साहित्य क्षेत्रात प्रत्येक वाक्यात विशिष्ट वर्ण असतात, वर्णांच्या समूहात वाक्ये असतात, वाक्यांच्या समूहात अर्थ असतात, वाक्य

आणि अर्थातून रसनिष्पत्ती होते. प्रत्येक काव्यग्रंथात विशिष्ट छंद असतो, या छंदातूनच काव्यरचना होते. या काव्यरचनेच्या अभ्यासातून ग्रंथकर्ता आणि वाचक या उभयतांच्या जीवनामध्ये मांगल्य, पवित्रता, प्रसन्नता येते. वर वर्णन केलेले सर्व गुण प्रदान करणारी देवता म्हणून श्री गणेशाचे वर्णन गोस्वामी तुलसीदासांनी केलेले आहे.

**वर्णानामर्थसंघानां रसांना छंदसामपि ।**
**मंगलानां च कर्त्तारौ वन्दे वाणी विनायकौ।।**

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांनी शब्द चित्रांकित केलेला श्री गणेश इतका अलौकिक आहे की त्याच्यासारखे वर्णन संस्कृत साहित्यात देखील मिळणे दुर्मिळ आहे. **त्वम् वाङ्मय:** असेही गणक ऋषींनी अथर्वशीर्षात गणेशाचे वर्णन केलेले आहे. त्याचा अर्थ तुम्ही वाङ्मय स्वरूप आहात. म्हणजे श्री ज्ञानेश्वर महाराजांनी रचलेल्या ज्ञानेश्वरीतील पहिल्याच अध्यायातील प्रारंभीच्या २० ओव्या होत. या ओव्यांचे अवलोकन केले असता भारतीय वाङ्मय कोणते आणि ते किती प्रकारचे आहे? तसेच किती दर्शन शास्त्रे आणि त्याचे निर्माते कोण? या सर्वांचा संपूर्ण आढावा विद्यार्थ्यांच्या सहज ध्यानी येईल. आपल्याला अजून किती ज्ञान प्राप्त करावयाचे आहे? यासंबंधीची जिज्ञासाही निर्माण होईल. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने या वीस ओव्यांचे चिंतन अत्यंत प्रेरणादायी ठरेल.